समादेशक
रा. रा. पो. बल गट क्र. २ पुणे

**समादेशक,**
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. २ पुणे - ४११०२२
दुरध्वनी : ०२०- २९५११०९१ /
**ISO 9001 : 2015 मानांकन प्राप्त गट**
ई मेल :- srpfgr2@rediffmail.com
cmdt.srpf2.pune@mahapolice.gov.in

---

**जा. क्र. अशा-१ / सपोशि भरती / प्रेस नोट / २०२४ / ४३७९** **पुणे दिनांक १७.०६.२०२४**

---

# प्रेस नोट

राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे येथील रिक्त असणा-या ३६२ सशस्त्र पोलीस शिपाई पदांसाठी भरती प्रक्रिया बुधवार दि.१९.०६.२०२४ रोजी पासून राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे येथील परेड ग्राऊंड वर सुरु होणार आहे. सदर भरती प्रक्रियेकरिता सर्व प्रकारची तयारी पुर्ण झालेली असून, उमेद्वारांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांचे ओळखपत्रासह सकाळी ठिक ०५:०० वा त्यांना नेमून दिलेल्या दिवशी राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे च्या **अलंकारण हॉल** येथील प्रवेशद्वाराजवळ बिनचूक उपस्थित राहावे. या भरती प्रक्रियेदरम्यान एखाद्या दिवशी पावसामुळे मैदानी चाचणी होऊ शकली नाही तर अशा उमेदवारांना त्यांनतरची सुयोग्य तारीख दिली जाईल.

तसेच काही उमेदवारांना इतर वेगळया पदांकरिता जर एकाच दिवशी मैदानी चाचणीची सुचना प्राप्त झालेली असेल तर त्यांना MAHA-IT कडून दुसरी तारीख देण्यात येईल. जर उमेदवारांना इतर काही अडचण असेल तर या कार्यालयाकडून त्याचे निरसन केले जाईल. सदर सशस्त्र पोलीस शिपाई भरती करीता सर्वप्रथम मैदानी चाचणी घेण्यात येणार आहे, अणि त्या मैदानी चाचणी मध्ये पात्र ठरल्यानंतर उमेदवारांची लेखी चाचणी घेण्यात येणार आहे.

मैदानी चाचणीची सर्व तयारी झाली असून उमेदवारांना आवाहन करण्यात येते की, आपणास MAHA-IT Website वरुन प्राप्त प्रवेशपत्र तसेच आधार कार्ड, फोटोग्राफ आणि आवश्यक त्या कागदपत्रांसह भरतीसाठी उपस्थित रहावयाचे आहे.

**( नम्रता पाटील )**
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. २, पुणे.